
08-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/07/2025 11:49 PM Page 1



## निवडक

### मोरजीत आज महिला दिन, महिला क्रीडा महोत्सव





■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ७ :** जीत आरोलकर आणि मांद्रे उदरगत संस्थेअंतर्गत मांद्रे मतदारसंघात प्रथमच नारी शक्तीला प्राधान्य देताना महिला दिनाचे औचित्य साधून महिला क्रीडा स्पर्धा शनिवार दि. ८ रोजी तेंबवाडा शासकीय मैदानावर आयोजित करण्यात आली आहे. या मैदानावर आयोजित केलेल्या नारीशक्ती क्रीडा मेळाव्याचे उद्‌घाटन पालये येथील ज्येष्ठ महिला जिने आतापर्यंत १०० पेक्षा जास्त त्या काळात मोफत बाळंतपण केले. त्या श्रीमती आत्माराम जाधव या प्रमुख पाहुण्या म्हणून या क्रीडा मेळाव्याला उपस्थित असतील. त्यांच्याच हस्ते क्रीडा मिळाव्याचे ध्वजारोहण करण्यात येणार आहे. शिवाय खास आकर्षण म्हणून मराठी चित्रपट अभिनेत्री आणि स्टार प्रवाहवर आई कुठे काय करते ? या मालिकेत गाजलेली मधुराणी गोखले यांची उपस्थिती असणार आहे. श्रीमती आत्माराम जाधव ही पालये येथील सर्वसामान्य महिला, पालये आणि केरी गावांमध्ये शंभरहून अधिक मोफत तिच्या कारकिर्दीत बाळंतपणा केले. डॉ. देसाई यांच्यासोबत बाळंतपणा दरम्यान अनेकांचे जीव वाचवण्यासाठी तिने महत्त्वाची भूमिका बजावली. १९८१ मध्ये शिवण करण्याचे प्रशिक्षण घेतले. परंतु करिअरच्या संधीपेक्षा कुटुंबाला तिने प्राधान्य दिले. तिचे समर्पण आणि त्याग आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे या महत्त्वाच्या कार्यक्रमात आमदार जीत अरुण कर यांनी महिला क्रीडा दिनाच्या निमित्ताने तिला प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले आहे.

### वाईपर वास्को कबड्डी संघाच्या कर्णधारपदी भार्गव मांद्रेकर

■ टीम दैनिक हेराल्ड



**हरमल, दि. ७ :** अखिल भारतीय कबड्डी लीग युवा ऑल स्टार्स चॅम्पियनशिप स्पर्धेत वाईपर स्क्वाड गोवा वास्को संघाच्या कर्णधारपदी कोरगाव येथील युवा कबड्डीपटू भार्गव भावार्थ मांद्रेकर यांची निवड झाली. उत्तराखंड हरिद्वार येथे सुरू होणाऱ्या व महिनाभर चालणाऱ्या १२ संघातील चॅम्पियनशिप मध्ये सहभागी झाले आहे. या संघात अन्य खेळाडू सचिन कृष्णन, प्रिन्स दहिया, जय बिजेंदर, गौरव राजबिर, सचिन जोंगिंदर, नितीन राजकुमार, राहुल विनोद, परवीन सिस्पाल, गगन पिनाम, ध्रुबिक गेहल, अभिजित पोतदार, सुरेश हाडपड, सुमित पांडे, बिलू लमानी, आशिष वेलिप, आकाश कमल, चंद्रकांत घाडी, संचित गवस व लक्ष्मण गावदा यांचा सहभाग आहे. राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धात संघाने भरीव कामगिरी केली होती.ह्या संघास सर्व थरातून शुभेच्छा देण्यात आल्या.

### लाडफे येथे हनुमान मूर्ती पुन:प्राणप्रतिष्ठापना आजपासून सोहळा कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. ७ : डिचोली तालुक्यातील लाडफे येथे रविवार दि. ९ रोजी श्री सातेरी मंदिरासमोरील पिंपळपेड नूतनीकरण करून श्री हनुमान मूर्ती पुन:प्राणप्रतिष्ठापना सोहळा होणार आहे. दि. ८ रोजी दुपारी श्री हनुमान मूर्ती वाजत गाजत घेऊन येणार आहेत तर नंतर संध्याकाळी ५ वाजता श्री महालक्ष्मी सांस्कृतिक ढोल ताशा पथक – पणजी यांच्या दिंडी मिरवणुकीने व त्यांच्या समवेत गावातील श्री हनुमान भक्त वाजत गाजत साथीने श्रींचे आगमन होणार आहे. रविवार दि. ९ रोजी सकाळी प्रायश्चित विधी, गणपती पूजन, पुण्याहवाचन, आचार्यवरण, प्राकार शुद्धी, गणेशा शांती होम, देवता स्थापना, वास्तु स्नान विधी, जलाधिवास, शय्या दिवस, मुख्यदेवता होम, दुपारी १२.१६ वाजता ह्या मुहूर्तावर मारुती देवस्थापना, प्रतिष्ठा तत्व होम, क्षेत्रपाल, बलिदान पूर्णाहुती, आरती, महागाऱ्हाणे व तीर्थप्रसाद होणार आहे. सकाळी ९.३० वाजता सुहासिनींनी गंगापूजन व देवता जलाधिवास करण्यासाठी येणे .संध्याकाळी भजनाचा भजन व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. तरी सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थित जाऊन सहकार्य करून श्रीच्या कृपाशीर्वादाचा लाभ घ्यावा अशी विनंती ही श्री सातेरी केळबाय देवस्थान समिती,महाजन व ग्रामस्थ – लाडफे यांनी केले आहे.

### हाऊसिंगबोर्ड साखळीत आज शास्त्रीय संगीत सभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ७ :** सरस्वती संगीत महाविद्यालय लातूर (रौप्य महोत्सवी वर्ष),राधाकृष्ण संगीत अकादमी साखळी आणि हाऊसिंग बोर्ड कॉलनी रेसिडन्स असोसिएशन हरवळे साखळी गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. ८ रोजी संध्याकाळी ५.३० वाजता श्री महालक्ष्मी देवस्थान हाऊसिंगबोर्ड कॉलनी हरवळे साखळी येथे शास्त्रीय संगीत सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाचे उद्‌घटन सरस्वती संगीत महाविद्यालय लातूरचे प्राचार्य तालमणी पं. राम बोरगावकर यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून साखळी नगरपालिकेच्या नगराध्यक्ष सिद्धी प्रभू परोब, देवस्थानचे अध्यक्ष संतोष भगत, प्रभानंद पाडलोसकर, महादेव देसाई, अकादमीचे अध्यक्ष प्रा. संतोष मळीक, संस्थापक गुरूवर्य रामचंद्र नाईक, सचिव दत्ताराम माडकर, कोषाध्यक्ष अनिल जल्मी उपस्थित राहणार आहे.

शास्त्रीय संगीत सभेत अनुजा व अनुष्का नाईक यांचे सहगायन, वासुदेव च्यारी यांचे एकेरी तबला वादन, गुरुदास गावकर यांचे गायन व शेवटी गुरुवर्य रामचंद्र धोंडू नाईक यांच्या गायनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. या सर्व कलाकारांना गोपीनाथ गावस, भास्कर गावस, स्मितल मळीक हे हार्मोनियम साथ तर राज मडगावकर,गोविंद गावस,वासुदेव च्यारी तबला् साथ करणार आहेत.संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय सालेलकर करणार आहेत. तरी सर्वांनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन अकादमीतर्फे करण्यात आले आहे.

### पेडणे येथील ब्राह्मण देवाचा उद्या वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ७ :** वर्ष पद्धतीप्रमाणे श्री देव ब्राह्मण (ओशलबाग धारगळ) देवाचा वर्धापन दिनांक ९ मार्च रोजी धार्मिक विधी द्वारे साजरा केला जाईल. सकाळच्या सत्रात श्री सत्यनारायणाची महापूजा, आरती तीर्थप्रसाद त्यानंतर दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसाद दिला जाईल. संपूर्ण महाप्रसादाचे वाटप व पुरस्कृत पंच सदस्य दीपतेशा नारोजी यांनी प्रदान केला आहे, त्यानंतर संध्याकाळी ५ वाजता स्थानिक भजनी कलाकारांचा कार्यक्रम होईल. रात्री ८.३० वाजता पावपणीचा कार्यक्रम होईल. रात्री १० कला व सांस्कृतिक संचालनालय पणजी यांच्या सौजन्याने शारदा कुमार शिरसाईकर लिखित व रामदास परब दिग्दर्शित तीन अंकी सामाजिक कौटुंबिक नाटक कुलदीप हे साजरे केले जाईल. तसेच दि. १० मार्च रोजी सोमवारी स्वर्गातील दशावतार हे दशावतारी नाटक साजरे केली जाईल. तरी या वर्धापन दिवसाच्या निमित्ताने गावातील तसेच सर्व पेडणे तालुक्यातील लोकांनी मोठ्या संख्येने या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त उत्सवाला उपस्थित राहावे व नाटकाचा लाभ घ्यावा ही आयोजकातर्फे विनंती आहे. स्थळ श्री ब्राह्मण देवस्थान अशा विभाग येथे आयोजिले आहे, अशी श्रीदेवी ब्राह्मण देवस्थान कमिटीतर्फे कळविण्यात आले आहे.

# पावसामुळे सामना रद्द झाला तर विजेतेपद कोणाला ?

## आयसीसीने अंतिम सामन्यासाठी राखीव दिवसाचीही केली व्यवस्था | सामना अटीतटीचा होण्याची शक्यता

दुबई, दि. ७ : भारत वि. न्यूझीलंड यांच्यात चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा अंतिम सामना खेळवला जाणार आहे. हा सामना ९ मार्चला दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाईल. या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारत आणि न्यूझीलंडचे संघ एकदा गट टप्प्यात आमनेसामने आले होते, तेव्हा टीम इंडियाने विजय मिळवला होता. मात्र, सध्या न्यूझीलंड संघही चांगल्या फॉर्मात आहे. यादरम्यान जर पावसामुळे हा अंतिम सामना रद्द झाला तर विजयी संघ कसा ठरणार, हे जाणून घेऊया.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये अजूनही अपराजित आहे. प्रथम, भारताने गट टप्प्यातील तिन्ही सामने जिंकले, त्यानंतर उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाचा पराभव केला. तर न्यूझीलंड संघाने गट टप्प्यात भारताविरुद्ध केवळ एकच सामना गमावला आहे. म्हणजेच हा सामना मोठा अटीतटीचा होण्याची शक्यता आहे.



आता पाऊस आणि हवामानाचा अंदाज जाणून घेऊया. अहवालानुसार तर दुबईमध्ये ९ मार्चला पाऊस पडण्याची शक्यता नाही. पण तरीही पाऊस पडला आणि सामना थांबला तर आयसीसीने अंतिम सामन्यासाठी राखीव दिवसाचीही व्यवस्था केली आहे. म्हणजे जर ९ मार्चला सामना होऊ शकला नाही तर तो १० मार्चला सामना खेळवला जाईल. जर ९ मार्चला अर्धा सामना खेळवण्यात आला आणि पावसामुळे सामना थांबवावा लागला तर १० मार्चला पुन्हा तिथूनच सामना खेळवण्यात येईल. जेणेकरून दोन्ही संघांना जेतेपद पटकावण्याची बरोबरीची संधी मिळेल.

२००२ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारत आणि श्रीलंकेने अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले होते. त्यादरम्यान दोन्ही दिवशी सामना होऊ शकला नाही. त्यानंतर आयसीसीच्या नियमानुसार दोन्ही संघांना संयुक्त विजेता घोषित करण्यात आले. यंदाही पाऊस पडला तर असाच निकाल लागण्याची शक्यता आहे. आयसीसीनुसार अंतिम सामना पूर्ण व्हायला हवा. हे शक्य नसल्यास संयुक्त विजेते घोषित केले जातील. अंतिम फेरीत आधी खेळलेल्या सामन्यांच्या आधारे निर्णय घेतला जाणार नाही. सामन्याच्या दिवशी जो संघ विजयी होईल तो जेतेपद पटकावेल.

भारताचा न्यूझीलंडविरूद्ध आयसीसीच्या स्पर्धेतील रेकॉर्ड फार चांगला नाही. न्यूझीलंडचा संघ भारतीय संघावर वरचढ ठरला आहे. २००० साली भारत आणि न्यूझीलंड यांच्यात चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना झाला होता, त्यावेळी न्यूझीलंडने बाजी मारली होती. त्यानंतर आता तब्बल २५ वर्षांनंतर पुन्हा एकदा भारत आणि न्यूझीलंडमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना होणार आहे.

### मॅट हेन्री दुखापतीमुळे फायनलला मुकणार

या जेतेपदाच्या सामन्यापूर्वी न्यूझीलंडची चिंता वाढली आहे. संघाचा स्टार वेगवान गोलंदाज मॅट हेन्री हा जेतेपदाचा सामना खेळण्याची शक्यता कमी आहे. त्याला उपांत्य फेरीच्या सामन्यादरम्यान दक्षिण आफ्रिकेचा यष्टीरक्षक हेनरिक क्लासेनचा झेल घेताना उजव्या खांद्याला दुखापत झाली. तथापि, हेन्रीने नंतर दोन षटके टाकली आणि क्षेत्ररक्षणही करताना दिसला. किवी संघाचे मुख्य प्रशिक्षक गॅरी स्टीड यांनी शुक्रवारी हेन्रीच्या दुखापतीविषयी सांगितले की, अंतिम सामन्याच्या सुमारे ४८ तास आधी हेन्रीच्या तंदुरुस्तीबाबत अजूनही शंका वाटत आहे. मला वाटते आमच्यासाठी सकारात्मक गोष्ट म्हणजे तो उपांत्य सामन्यात पुन्हा गोलंदाजी करायला आला. त्याने क्षेत्ररक्षणही केले. पण खांद्यावर पडल्यामुळे त्याला अजूनही वेदना होत आहेत. सध्या त्याचे स्कॅनिंग करण्यात आले आहे. आम्ही त्याला अंतिम सामन्यात खेळण्याची संधी देऊ इच्छितो. मात्र, त्याची स्थिती थोडी अनिश्चित आहे. आशा आहे की तो लवकरच बरा होईल.'

दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यातील उपांत्य सामन्यादरम्यान हेन्रीच्या उजव्या खांद्याला दुखापत झाली. क्षेत्ररक्षण करताना, तो २९ व्या षटकात हेनरिक क्लासेनचा झेल घेण्यासाठी लॉन्ग ऑनकडे धावला आणि डायव्ह मारला. त्याने झेल घेतला पण तो जखमी झाला. यानंतर तो काही काळ मैदानाबाहेरही गेला. तथापि, तो सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात मैदानात उतरला. त्याने दोन षटके टाकली. दुखापतीनंतर मैदानात परतल्यानंतर तो फिल्डिंग करताना डायव्हिंग करतानाही दिसला.

### कोहली रचणार विक्रम

विराट कोहली आतापर्यंतच्या चॅम्पियन्स ट्रॉफी सामन्यांत उत्तम फॉर्ममध्ये असल्याचे दिसून आले आहे. ग्रुप स्टेज सामन्यात तो न्यूझीलंडविरुद्ध मोठी खेळी करू शकला नाही. पण त्याचे किवी संघाविरुद्धचे वनडे रेकॉर्ड खूपच लक्षवेधी आहे. आकडेवारीवरून हे स्पष्ट होते. न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात भारतीय संघासाठी सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे, त्याने किवी संघाविरुद्धच्या ४२ एकदिवसीय सामन्यांच्या ४१ डावांमध्ये फलंदाजी करताना ४६.०५ च्या सरासरीने एकूण १७५० धावा केल्या आहेत, ज्यामध्ये ५ शतके आणि ८ अर्धशतके आहेत. कोहलीने आतापर्यंत न्यूझीलंडविरुद्ध ३२ एकदिवसीय सामने खेळले आहेत आणि ३२ डावांमध्ये फलंदाजी करताना ५७.१० च्या सरासरीने १६५६ धावा केल्या आहेत. अशा परिस्थितीत, जर कोहलीने अंतिम सामन्यात आणखी ९५ धावा केल्या तर तो न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय सामन्यात भारताकडून सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनेल. कोहलीने आतापर्यंत न्यूझीलंडविरुद्ध ६ शतके आणि ९ अर्धशतके झळकावली आहेत.

### जडेजाला विक्रमाची संधी

रवींद्र जडेजाने आतापर्यंत आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये बॅट आणि बॉल दोन्हीमध्ये चमकदार कामगिरी केली आहे. टीम इंडियाच्या या स्टार अष्टपैलूने दुबईच्या संथ खेळपट्टीवर मधल्या षटकांमध्ये विरोधी फलंदाजांना मोकळेपणाने खेळण्याची संधी न देता जखडून ठेवले. जड्डूने आतापर्यंत ४ सामन्यांमध्ये ४ विकेट घेतल्या असून त्याचा इकॉनॉमी रेट ४.७८ राहिला आहे. ९ मार्च रोजी न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात, पुन्हा एकदा सर्व भारतीय चाहत्यांना त्याच्याकडून मॅच विनिंग कामगिरीची अपेक्षा आहे. यादरम्यान, त्याने जर ३ बळी घेतले तर तो ऑस्ट्रेलियन माजी गोलंदाज ब्रेट ली, ग्लेन मॅकग्रा आणि इंग्लंडचा माजी गोलंदाज जेम्स अँडरसन यांना एकाच वेळी मागे टाकेल.

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासात सर्वाधिक विकेट्स घेण्याचा विक्रम न्यूझीलंडचा माजी खेळाडू काइल मिल्सच्या नावावर आहे. त्याने या स्पर्धेतील १५ सामन्यांमध्ये एकूण २८ विकेट्स घेतल्या आहेत. भारताचा रवींद्र जडेजा या यादीत % व्या क्रमांकावर आहे. जडेजाने १४ सामन्यांमध्ये २७.८० च्या सरासरीने एकूण 20 विकेट्स घेतल्या आहेत. जड्डूने ९ मार्च रोजी न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात आणखी तीन विकेट्स घेतल्या तर तो ऑस्ट्रेलियाच्या ब्रेट ली (२२) आणि ग्लेन मॅकग्रा (२१ विकेट्स), तर इंग्लंडच्या जेम्स अँडरसन (२१) यांना मागे टाकेल.





सातेरी प्रिमिअर लीग अंडर आर्म क्रिकेट स्पर्धेत विजेत्यांना बक्षीस प्रदान करताना डॉ. गुरुदास नाटेकर. बाजूला रोहन कवळेकर, योगेश खेडेकर व मान्यवर.

## सातेरी प्रिमिअर लीग क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ५ :** सातेरी बॉईज स्पोर्ट्स अँड कल्चरल असोसिएशनने नुकतेच सातेरी प्रिमिअर लीग अंडर आर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून इंडस्ट्रियालिस्ट आणि गोवा क्रिकेट असोसिएशनचे आजीव सदस्य डॉ. गुरुदास नाटेकर उपस्थित होते.

यावेळी म्हापसा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष रोहन कवळेकर, योगेश खेडेकर उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. नाटेकर यांनी सातेरी बॉईज स्पोर्ट्स अँड कल्चरल असोसिएशनचे कौतुक करताना म्हणाले की, असल्या स्पर्धा भरविल्यामुळे होतकरू खेळाडूंना आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करण्यास वाव मिळतो. डॉ. नाटेकर यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीसे प्रदान करण्यात आली.

## जगन्नाथराव जोशी सरकारी विद्यालयाचे स्नेहसंमेलन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ७ :** स्वातंत्र्यसेनानी श्री जगन्नाथराव जोशी सरकारी प्राथमिक विद्यालय हाऊसिंग बोर्ड साखळीचे स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात झाला.

यावेळी व्यासपीठावर साखळी नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ.सिद्धी परोब,डिचोली तालुका भाग शिक्षणाधिकारी संज्योती पावसकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सिद्धि गुणाजी, पालक शिक्षक संघ अध्यक्षा रेश्मा नाईक, मुख्याध्यापिका सौ.कृपाली कृष्णा गावस उपस्थित होत्या.

स्वागत, प्रास्ताविक व संपूर्ण वर्षभरातील कार्यक्रमाचे अहवाल वाचन मुख्याध्यापिका सौ.कृपाली गावस यांनी केले. यावेळी त्यांनी शाळेच्या विकासासाठी पालक,देवस्थान व हाऊसिंग कॉलनी कॉलनीचे असोसिएशनचे सहकार्य मिळत असल्याचे सांगितले.



साखळी : स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना सौ.सिद्धी परोब,सोबत सौ.संज्योती पावसकर, सिद्धि गुणाजी, रेश्मा नाईक व कृपाली गावस.

शाळेच्या शिक्षिकांनी स्वागत गीताने व पुष्पगुच्छ देऊनस्वागत केले. शिक्षिका दीप्ती सोमनाथ धुमसकर यांनी मान्यवरांची ओळख केली.

त्यानंतर वर्षभरातील विविध स्पर्धांमधील विजेत्यांना बक्षिसे वितरित करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या सालाकरिता इयत्ता चौथीच्या वर्गातून आदर्श विद्यार्थी म्हणून साची विनायक नाईक व अष्टपैलू विद्यार्थिनी म्हणून माही महेश परब यांना गौरविण्यात आले.पूर्व प्राथमिक वर्गातून आदर्श विद्यार्थीनीचा मान मिधा रोहन कर्पे व शिस्तप्रिय विद्यार्थीनीचा मान आर्या अमर देसाई या विद्यार्थ्यांना प्राप्त झाला.तसेच शैक्षणिक वर्ष २०२३–२४ राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत इयत्ता चौथीची अवनी योगेश पोतदार ८९७ गुण मिळवून डिचोली तालुक्यात तिसरी व साखळीत प्रथम आल्याने तिलाही गौरविले.

नगराध्यक्षा सिद्धी परब यांनी आपल्या भाषणात मुलांचे कौतुक व शिक्षकांची मेहनत याविषयी समाधान व्यक्त केले आणि त्या म्हणाल्या ज्या ज्या वेळी या शाळेला माझी गरज पडेल त्या त्या वेळी मी सदोदीत या शाळेला मदत करीत राहीन असे सांगितले.व तात्काळ दोन पंखे देण्याचे जाहीर केले.

पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षा रेश्मा नाईक गेली आठ वर्ष शाळेसाठी सहकार्य करत असल्याने त्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.यावेळी त्यांनी सत्काराला उत्तर देताना आपण शाळेसाठी सदोदित कार्य करीत राहीन असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका शांतीप्रिया नाईक यांनी केले.त्यानंतर विविधरंगी मनोरंजनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रम झाले. या कार्यक्रमाचे निवेदन शोभा देसाई व विद्या गावस यांनी केले.

# नियोजन, व्यवस्थापनात आदर्श निर्माण करूया

## मामलेदार प्रवीण गावस | साळ गडे उत्सवांसाठी सरकारी यंत्रणा व देवस्थान समिती यांच्यात बैठक

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ७ :** साळ मधील प्रसिद्ध गडे उत्सव शुक्रवार दि. १४ ते रविवार दि. १६ मार्च पर्यंत, असे तीन रात्री हा उत्सव साजरा होणार असून यासाठी डिचोलीचे मामलेदार प्रवीण गावस, डिचोली मतदार संघाचे आमदार डॉ. चंद्रकांत शेटये, श्री महादेव भूमिका देवस्थान समिती, गडे सदस्य, साळ मधील विविध संस्था, क्लब व सरकारी यंत्रणा गडे उत्सवाला येणाऱ्या भाविकांसाठी सुविधा, उत्सव सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विविध प्रकारे नियोजन करण्यासाठी बैठक होऊन काही सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे मामलेदार गावस, आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये सरकारी यंत्र देवस्थान समितीकडे सदस्य व पोलिस यंत्रणेमार्फत केले आहे.

साळ येथील श्री भूमिका मंदिराच्या सभा मंडपात आमदार डॉ. शेटये यांच्या अध्यक्षतेखाली डिचोलीचे मामलेदार प्रवीण गावस यांच्या मार्गदर्शनाखाली देवस्थान समिती, गडे सदस्य, पोलीस खाते, पोलिस वाहतूक काते, गुप्तचर खाते आरोग्य खाते, वीज खाते, अग्निशमन दल, पाणीपुरवठा खाते अबकारी खाते यांच्यामध्ये नुकतीच बैठक झाली.



साळ : बैठकीत उपस्थित आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, मामलेदार प्रवीण गावस, संयुक्त मामलेदार अभिजित गावकर, पोलिस उप अधीक्षक जिवबा दळवी, पोलिस निरीक्षक दिनेश गडेकर, गौरेश परब, कालिदास राऊत, आत्माराम नाईक, डॉ. गौरेश नाईक, अग्निशमन दलाचे अधिकारी संतोष गावस व इतर.

यावेळी डिचोलीचे संयुक्त मामलेदार अभिजीत गावकर, पोलिस उपाधीक्षक जिवबा दळवी, पोलिस निरीक्षक दिनेश गडेकर, सहाय्यक उप पोलिस निरीक्षक लक्ष्मण घाडी, पोलिस कर्मचारी संतोष गावस, वाहतूक खाते पोलिस निरीक्षक गौरेश परब, पाणीपुरवठा खात्याचे सहाय्यक अभियंता दत्तराज पै काकोडे, तांत्रिक सहाय्यक अभियंता नेहाल मांजरेकर, अग्निशमन दलाचे अधिकारी संतोष गावस, पाणीपुरवठा खात्याचे शिरोडकर, वीज खात्याचे सहाय्यक अभियंता पाळणी, आरोग्य खात्याचे डॉ. गौरीश नाईक प्रसाद ठाकूर, अबकारी खात्याचे आत्माराम नाईक, पंचायत उपसचिव शांबा घुरे, अग्निशमन दलाचे राहुल परब, श्री महादेव भूमिका देवस्थानचे अध्यक्ष कालिदास राऊत आदी व्यासपीठावर उपस्थित होते . गडे उत्सवा दरम्यान आठ दिवस रात्र नळाद्वारे पाणीपुरवठा यंत्रणा निरंतर चालू ठेवणे आवश्यक आहे. वीज खंडित न होण्यासाठी तातडीचे व्यवस्थापन करून वीज प्रवाह सुरळीत करणे, उत्सवात अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असावी तसेच वाहतूक व्यवस्थेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी पोलीस वाहतूक नियंत्रण आवश्यक आहे आरोग्य सेवेबरोबर आपत्कालीन १०८ वाहन तीनही रात्री उपलब्ध असणे अग्निशमन दलाचे जवान व वाहन तैनात असणे फार महत्त्वाचे आहे .

गडे उत्सवाला साळमध्ये प्रवेश करण्यासाठी तीन रस्ते असून त्यापैकी धुमासे मार्गे येणाऱ्या वाहनांना तसेच कासारपाल मार्गे येणाऱ्या वाहनांना रोज रात्री १० नंतर दोन्ही मार्ग बंद केले जातील तसेच पहाटे ५ वाजल्यानंतरच सर्व वाहने प्रस्थान करतील हे भाविकांनी लक्षात ठेवावे . धुमासे येथे श्री सातेरी पुरमार मंदिराजवळ तर कासारपाल मार्गे येणाऱ्या वाहनांना हे सिद्धेश्वर देवस्थान क्षेत्राजवळ रस्ता पूर्णपणे बंद केला जाईल आपत्कालीन सेवेसाठी तिसरा रस्ता दोडामार्ग हा रस्ता १२ वाजेपर्यंत खुला असेल बारा वाजल्यानंतर तोही बंद केला जाईल व पहाटे ५ वा भाविकांसाठी जाण्यासाठी खुले केला जाईल.

गडे देतेवेळी गड्यामागे धावताना भाविकांनी मोबाईलचा वापर करणे, शूटिंग काढणे यावर पूर्णपणे बंदी असून हे करताना आढळल्यास मोबाईल जप्त करून कार्यालयात भरती करून पहाटे ५ वाजल्यानंतर तो देण्यात येईल तसेच दारू बाटली ची वाहतूक करण्यावर बंदी असून असे आढळल्यास योग्य ती कारवाई पोलीस यंत्रणे करून केली जाईल तसेच रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी करण्यास बंदी असून भाविकांनी हे गोष्ट लक्षात ठेवावी.

या बैठकीला सगुण राऊत, आदिनाथ परब, विश्वनाथ परब , अशोक राऊत, प्रशांत राऊत, अर्जुन परब, फटी बायकर मुकुंद परब, साईश राऊत, सुरेश परब, ज्ञानेश्वर चिनरकर, रामदास परब, महेश परब, पंढरीनाथ राऊत, भूषण बायकर, कृष्णा परब, उत्तम राऊत, जयवंत पडवळ, सखाराम परब, प्रेमानंद परब, गौरेश राऊत, दिलीप परब, दत्ताराम परब व अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १८४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 184 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .